जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक २९.१०.२०२५**

‘‘ठाणे पोलीसांकडून राष्ट्रीय एकता दिवस निमित्त एकता दौडचे आयोजन’’

भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती निमित्त ठाणे शहरात दिनांक ३१/१०/२०२५ रोजी सकाळी ०७.०० वाजता एकता दौड (रन फॉर युनिटी) चे आयोजन करण्यात येणार आहे. या विशेष दिवशी देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्यासाठी आणि मजबूत करण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यासाठी संपुर्ण देशभरात एकता दौड आयोजित करण्यात आलेली आहे. सदर एकता दौड मध्ये ठाण्यातील सर्व नागरिकांनी, ठाणे पोलीस व त्यांचे कुटुंबीय तसेच पत्रकार बंधु भगिनी यांनी सक्रीय सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. तरी सर्वानी सदर कार्यक्रमासाठी दिनांक ३१/१०/२०२५ रोजी सकाळी ०६.४५ वाजे पर्यत शिव समर्थ विदयालय, ठाणे येथे उपस्थित रहावे.

एकता दौड मार्गीका खालील प्रमाणे आहे.

शिवसमर्थ विदयालय येथुन सुरू होवुन- मुस चौक- टॉवर नाका- गडकरी रंगायतन सर्कल - शिवसमर्थ विदयालय येथे समाप्त होणार आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर